महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८७ वा | दिनांक : २९/१२/२०२४ | वार : रविवार

## वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज सकाळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये तासभर चर्चा झाली. या भेटीत प्रकाश आंबेडकर यांनी परभणीच्या घटनेसंदर्भात चर्चा करत मुख्यमंत्र्यांकडे काही मागण्या केल्या होत्या. त्यातील काही मागण्या मान्य झाल्याची माहिती प्रकाश आंबेडकर यांनी सोशल मीडियावर दिली.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, आज सकाळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी परभणीच्या प्रकरणासंदर्भात चर्चा झाली. पीडित सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना देण्यात येणारी मदत ही किरकोळ असून, त्यांना एक कोटींची भरपाई देण्यात यावी आणि त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्यात यावी, अशी मागणी केली.

परभणी प्रकरणात चौकशी करून ज्यांनी निरपराध नागरिकांना क्रूरपणे मारहाण केली आहे. अशा पोलिसांच्या विरोधात एफआयआर नोंदवली गेली पाहिजे, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली, ती मागणी त्यांनी मान्य केली आहे, असे प्रकाश आंबेडकरांनी सांगितले.

आंबेडकरी वस्त्यांमध्ये जाऊन काही नागरिकांच्या घरांची मोडतोड करण्यात आलेली आहे. अशा नागरिकांना शासनाने नुकसान भरपाई देण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्य केले केल्याचेही आंबेडकरांनी सांगितले.

त्याचप्रमाणे आदिवासी विद्यार्थ्यांच्या DBT संदर्भात सुद्धा मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात आली असून, त्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे सांगितल्याचे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

आंबेडकर यांनी केलेल्या प्रमुख मागण्या

- परभणी प्रकरणातील पीडित सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना 1 कोटी रुपये नुकसान भरपाई द्यावी
- सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्या
- परभणीत पोलिसांनी क्रूरतेने केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करण्यासाठी आणि पुरेशी भरपाई देण्यासाठी सर्वेक्षण करा
- 1 जानेवारी रोजी होणाऱ्या भीमा कोरेगावच्या अभिवादन सोहळ्यापूर्वी फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा हिंसाचार आणि चुकीची माहिती भडकावण्याच्या कोणत्याही प्रयत्नांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि ते हाणून पाडण्यासाठी पोलिसांना निर्देश द्यावेत
- आदिवासी विद्यार्थ्यांसाठी थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजना रद्द करा आणि पूर्वीची प्रणाली पुन्हा सुरू करावी.

## गोपीनाथ मुंडे लेकीसह भाजप सोडणार होते : अजित पवार



**मुंबई :** देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. त्यांच्यावर आज सकाळी ११:४५ च्या सुमारास दिल्लीतील निगमबोध घाट येथे लष्करी तसेच शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, अजित पवार यांचा एक जुना व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये त्यांनी गोपीनाथ मुंडे लेकीसह भाजप सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश करणार होते. परंतु, तत्कालिन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्या प्रवेशाला विरोध दर्शवला होता, असे सांगितले.

मनमोहन सिंग यांच्या निधनाने फक्त काँग्रेसच नव्हे, तर सर्वपक्षीयांनी हळहळ व्यक्त केली. अजित पवार यांनी अनेक वर्षांपूर्वी 'एबीपी माझा'च्या कार्यक्रमात सांगितलेला एक किस्सा, आता मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर पुन्हा चर्चेत आला आहे.

गोपीनाथ मुंडे यांनी भारतीय जनता पक्ष सोडण्याचा निर्णय घेतलेला होता. त्यांच्यासोबत त्यावेळी पाच आमदार - पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, माधुरीताई मिसाळ, पंकजाताई मुंडे अजून कोणीतरी होते. दिल्लीमध्ये आता त्यांचा पक्षप्रवेश घेणार, सगळे काही ठरलेले असताना अचानक डॉ. मनमोहन सिंहजी यांना ज्या वेळेस वरिष्ठांकडून सांगण्यात आले, की गोपीनाथ मुंडे यांना पक्षप्रवेश दिला जातोय, त्यावेळी ते म्हणाले होते, की मी पंतप्रधान असताना लोकसभेमधील भारतीय जनता पक्षाच्या उपनेत्यांना पक्षप्रवेश दिलेला मला चालणार नाही, अशा पद्धतीने पक्ष फोडायचा नसतो. आणि मग आता काय करायचे.. गाड्या तर सगळ्या आलेल्या.. पक्ष प्रवेश व्हायचा होता. मग ते सुषमा स्वराज यांच्याकडे गेले, बहनजी... बहनजी.. मग बहनजींनी थांबवले म्हणून गोपीनाथ मुंडे भाजपात थांबले, अन्यथा ते काँग्रेसमध्ये गेले असते. असे ते वातावरण त्या ठिकाणी करण्यात आले, असा किस्सा अजित पवार यांनी सांगितला होता.

## सुरेश धसांनी माफी मागावी : प्राजक्ता माळी

**मुंबई :** भाजप आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना अभिनेत्री प्राजक्ता माळीचा उल्लेख केला होता. यावरूनच राजकारणात कलाकारांना का खेचता? असा सवाल अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने सुरेश धस यांना केला आहे. या प्रकरणावर शांत राहा, असे मला सर्वांनी सांगितले. या सर्व आवया येतात आणि निघून जातात. चिखलफेक होऊ नये, म्हणून मी इतके दिवस शांत बसले. परंतु, लोकप्रतिनिधी आपल्यावर चिखलफेक करतात, त्यावेळी बोलणे गरजेचे आहे, असे प्राजक्ता माळी म्हणाली.

या प्रकरणी मी महिला आयोगाकडे तक्रार केली असल्याचे प्राजक्ता माळी यावेळी सांगितले. आमचे कलाक्षेत्र बदनाम नाही, परंतु, अशा माणसांमुळे आमचे कलाक्षेत्र बदनाम होते, असेही तिने सांगितले. ती आज पत्रकार परिषदेत बोलत होती.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीच्या नावाचा उल्लेख केला होता.

अभिनेत्री प्राजक्ताताई माळी आमच्याकडे येतात. आम्ही परळीत बघत असतो, रश्मिका मंधाना, सपना चौधरी येत असतात. ज्यांना इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचं शिक्षण घ्यायचे असेल त्यांनी परळीत यावे. प्राजक्ता माळीही आमच्याकडे येत असतात. त्यांचा अतिशय जवळचा पत्ता सापडायचा असेल, तर आमचा परळी पॅटर्न बघितला पाहिजे, असे सुरेश धस यांनी म्हटले होते.

एका सांस्कृतिक कार्यक्रमात सत्कार स्वीकारताना काढलेला एक फोटो, ती आमची एकमेव भेट आणि धन्यवाद या एकमेव शब्दावरून एवढी आरोळी उठवावी? असा सवाल प्राजक्ता माळीने केला. माझ्यावर माझ्या सोबतच्या लोकांचा विश्वास होता.

ती माझी जमेची बाजू होती. त्यामुळे मला माझ्या चारित्र्यावर स्पष्टीकरण देण्यासाठी समोर येण्याची गरज वाटली नाही. आज आलेली वेळी नामुष्की आहे. एक लोकप्रतिनिधी टिपणी करतात, त्यामुळे ही वेळ आली आहे, अशी खंत प्राजक्ता माळीने व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ डिसेंबर २०२४


## राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्‌घाटन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** भारत शिक्षण संस्था उमरगा संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मुरूम ता. उमरगा जि.धाराशिव अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा मौजे गणेश नगर ता. उमरगा जि.धाराशिव येथे उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी भारत शिक्षण संस्थेचे संचालक श्री तानाजीराव फुगटे तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक सरपंच सौ. उषाताई संजय चव्हाण, उपसरपंच सतीश पवार, पोलीस पाटील सौ कलावती चव्हाण, तसेच तंटामुक्त अध्यक्ष माणिक राठोड व प्रतिष्ठित नागरिक श्री बाला राठोड , जि प मुख्याध्यापक राठोड सर, सहशिक्षक हुलगे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले सर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किसन माने व कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी उपासे जी डी यांनी केले.

शिबिर उद्घाटन प्रसंगी प्राचार्य गोविंद इंगोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा राठोड एस बी यांनी आभार मानले यावेळी प्रा. वर्षा हुलगुंडे, सुजित चिकुंद्रे प्रा. प्रकाश चव्हाण प्रा. बालाजी इंगोले, प्रा. किशोर कांबळे,प्रा श्रीकांत शिंदे,प्रा विनय इंगळे प्रा रोहन हराळकर प्रा. राजेंद्र बुवा प्रा. प्रसाद इंगोले विलास चव्हाण अनिकेत सगट राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आदी उपस्थित होते






## उद्धव ठाकरे यांचा परभणी आणि बीड जिल्हा दौरा

**मुंबई :** उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे परभणी आणि बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्या दरम्यान ते सोमनाथ सूर्यवंशी आणि संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या दोन्ही प्रकरणावरून राज्य सरकारला घेरण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीतील नेते करत आहेत.

बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात राज्य सरकारमधील काही नेत्यांची नावे देखील समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर बीडमध्ये महामोर्चाचे आयोजन देखील करण्यात आले होते. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेणार आहेत. या आधी देखील महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेतली होती.

बीड येथील दंगलीमध्ये अटक करण्यात आलेले सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला होता. त्यानंतर काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी देखील सूर्यवंशी कुटुंबियांची भेट घेतली होती. आता उद्धव ठाकरे देखील सूर्यवंशी कुटुंबाची भेट घेणार आहेत. त्यामुळे या दोन्ही प्रकरणावरून महायुती सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीमधील नेते करत आहेत.

## सामाजिक जाणीव आणि जीवनदृष्टी हे श्रेष्ठ विनोदाचे कोंदण - शीलवंत वाढवे





**छ. संभाजीनगर :** मराठी साहित्यातीलविनोदाकडे समाजसुधारणेचे एक प्रभावी साधन म्हणून श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, चिं.वि.जोशी, आचार्य अत्रे, वामन होवाळ प्रभृतींनी पाहिले. सामाजिक जाणीव आणि जीवनदृष्टी याचे मूल्यभान श्रेष्ठ विनोदकारांनी बाळगल्याने मराठी साहित्यात उत्तम विनोदलेखनाची परंपरा निर्माण झाली.

मनुष्याप्रती असलेला सहानुभाव, सामाजिक जाणीव आणि जीवनदृष्टी यांचे कोंदण लाभलेला विनोद म्हणूनच श्रेष्ठ ठरला असे प्रतिपादन प्रसिद्ध विनोदी लेखक शीलवंत वाढवे यांनी छ. संभाजीनगर येथे मराठवाडा साहित्य परिषद आयोजित 'स्वागत' उपक्रमांतर्गत आपल्या लेखनामागील प्रेरणा व भूमिका विशद करताना व्यक्त केले. मसापचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रस्तुत नावीन्यपूर्ण, अभिनव "स्वागत" हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे, 'हास्यरसायन' व 'हास्यगाथा' या विनोदी कथासंग्रहाचे लेखक शीलवंत वाढवे यांचा परिचय डॉ.हंसराज जाधव यांनी करून दिला.

कार्यवाह डॉ.दादा गोरे यांनी 'अक्षरयात्रा' हा आपला संपादित ग्रंथ व पुष्पगुच्छ भेट देऊन वाढवे यांचा सत्कार केला. यानंतर विनोदकार शीलवंत वाढवे यांनी श्रोत्यांशी मुक्त संवाद साधला. तसेच ,आपल्या लेखनामागील प्रेरणा, आपली भूमिका याची मांडणी मराठी विनोदपरंपरेचा परामर्श घेतला. उत्तरार्धात, 'पटपडताळणी' ही आपली विनोदी कथा खास खुमासदार शैलीत सादर केली.

कार्यक्रमास कवी दासू वैद्य, साहित्यिक, समीक्षक डॉ. राहुल कोसंबी, बालकवी गणेश घुले, गणेश मोहिते, हास्यकवी प्रा.डॉ. विष्णू सुरासे, विश्वनाथ ससे यांच्यासह रसिकश्रोत्यांची उपस्थिती होती.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ डिसेंबर २०२४

## अध्ययन स्तर उंचावण्यासाठी मुलांची गुणवत्ता वाढवावी : गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ



**कन्नड (अरुण थोरात):** जि.प. प्रशाला कन्नड येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ व मुख्याध्यापक दिलीप गायकवाड होते, अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख बाजीराव ताठे होते. दिंवगत मा. पंतप्रधान मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. परिषदेत विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.

दशसूत्री कार्यक्रमा अंतर्गत मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी श्रीश्रीमाळ यांनी सांगितले की, अध्ययन स्तर उंचावण्यासाठी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवावी, उपक्रम घेऊन कलागुणांना प्रोत्साहन दिले पाहिजे. विद्यार्थ्यांचे राहणीमान आरोग्य स्वच्छता यांवर लक्ष केंद्रित केले.

शालेय परिसर स्वच्छता, सोयी सुविधा, आनंददायी वातावरण निर्मिती करा, शाळा सुंदर तर कराच पण विद्यार्थीही आपल्या कडे जि.प. शाळांकडे कसा आकर्षित होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करा. आपल्या शाळेत मुलं टिकले पाहिजे असे वातावरण तयार करा. असेही त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक दिलीप गायकवाड यांनी दशसूत्री कार्यक्रम या विषयावर संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याबाबत मार्गदर्शन केले. केंद्र प्रमुख बाजीराव ताठे यांनी शाळेची गुणवत्ता व वेळ, उल्हास ॲप, सरल पोर्टल अपार आयडी, टार्गेट पीक याबाबत मार्गदर्शन केले. शाळाबाह्य विद्यार्थी अनुपस्थित मुलांची संख्या आरोग्य संदर्भात व वर्ग अध्यापन करताना स्वःहस्तलिखित साहित्य बनवायचे अपेक्षा व्यक्त केली.

विषयतज्ञ आफ्रोज शेख यांनी विद्यार्थी पालक शिक्षक यांचा ग्रुप बनवण्याचे आवाहन केले. हिवरखेड चे मु.ध्या. बाळासाहेब गावंडे यांनी शारीरिक शिक्षणाची गरज याविषयी मार्गदर्शन केले. केंद्रस्तरीय परिषदेत जि.प.कें. प्रा. शा. कन्नड नंबर एक मराठी व उर्दू, कन्नड नंबर दोन उर्दू, कन्नड नंबर तीन, मंक्रमणपूर, रेल, रेल तांडा, साखर कारखाना, हिवरखेडा गौ. ब्राह्मणी, गराडा, कोळसवाडी, गारगोटी तांडा, जिल्हा परिषद प्रशाला कन्नड आदी शाळांतील शिक्षक व शिक्षिका यांनी सहभाग घेतला. या परिषदचे आयोजन जि. प. प्रा. शा. गराडा यांच्याकडे होते.

प्रस्ताविक हनुमंत सोमवंशी यांनी तर सूत्रसंचालन व आभार दिलीप मगर यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी कें.शा. मुख्याध्यापक सतीश कोळी सह प्रशालेचे सर्व शिक्षक तसेच गराडा शाळेचे मु.ध्या. हनुमंत सोमवंशी,छायाबाई देवरे, उषा महाजन, संध्या डाखोडे, सविता परदेशी आदिंनी परिश्रम घेतले.

## वाचनाने मुले स्वप्नांच्या मागे धावतात - लेखक बाबा भांड



**कन्नड (अरुण थोरात):** अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे. वाचन केले की मुलगा स्वप्न पहायला लागतो. स्वप्नाच्या मागे धावायला लागतो. वाचन हा एक महत्त्वाचा संस्कार आहे. मुलांनी प्रयत्नपूर्वक वाचन वाढवायला हवे.

वाचानाने विद्यार्थ्यांचे आत्मबल वाढते. असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक बाबा भांड यांनी केले. कर्मवीर रामराव अण्णा बहिरगावकर यांच्या 32 व्या पुण्यतिथी निमित्त कन्नड येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

'वाचन आहे प्रवास सुंदर..' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर अँड भीमराव पवार, अँड कृष्णा जाधव , डॉ मिलिंद पाटील, भास्करराव पवार, डॉ यशवंत पवार आदींची उपस्थिती होती. आपल्या व्याख्यानात बाबा भांड पुढे म्हणाले की, "कर्मवीर रामराव अण्णा बहिरगावकर यांनी ग्राम विकासाचे आदर्श उदाहरण बहिरगावच्या रूपाने उभे केले.

अण्णांनी केले काम जगासमोर यायला हवे. अण्णा साहित्य प्रेमी होते. त्यांनी बहिरगाव येथे पहिले ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित केले होते. माझ्या व्यक्तिगत जीवनात वाचनामुळे मी लेखन करून लागलो आणि प्रकाशन संस्थाही चालवतो.

माझ्या आजच्या यशात वाचनाचे महत्त्वाचे स्थान आहे." बाबा भांड यांनी सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या विविध उपक्रमाचे कौतुक केले.

त्यांनी यावेळी वाचनालयाला मोठी ग्रंथभेट दिली.डॉ रूपेश मोरे यांनी आपल्या प्रास्ताविकात कर्मवीर रामराव अण्णा बहिरगावकर यांच्या कार्याची ओळख करून दिली. प्रा. शिवाजी हुसे यांनी पाहुण्यांच्या परिचय करून दिला.

संजय त्रिभुवन यांनी सूत्रसंचालन केले तर संजय जाधव यांनी आभार मानले.

यावेळी प्रा. संजय गायकवाड, राजेंद्र नलावडे, युवराज सोनवणे, राजेंद्र पवार, संजय पवार, रवींद्र पवार, श्री राऊत, प्रा. संतोष देशमुख, प्रा. विजय भोसले, बाबासाहेब सोनवणे, अजय पवार, प्रदीप पवार, संदीप पवार, प्रतिक्षित पवार, प्रा. गोविंद बुरसे, प्रा. संजय भालेराव, प्रा प्रकाश खेत्री, भगवान ठाकरे, ज्ञानेश्र्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, ऋषिकेश शिवदे आदीसह नागरिक व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002